# पॉलिटेक्निकसाठी उद्यापासून प्रवेशप्रक्रिया

**म. टा. प्रतिनिधी,** मुंबई

दहावीचा निकाल लागल्यानंतर, बुधवारी २९ मेपासून पॉलिटेक्निक अभ्यासक्रमासाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. तंत्रशिक्षण संचालनालयाने दहावीनंतरच्या पदविका अभ्यासक्रमासाठीचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

दहावीनंतर तीन वर्षांचा हा अभ्यासक्रम असून सिव्हिल, इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल, अणुविद्युत, कॉम्प्युटर, केमिकल या शाखांसाठी प्रवेश घेता येईल. या प्रवेशप्रक्रियेचा तपशील, ऑनलाइन अर्ज https://dte.maharashtra.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध होईल.